# संपादकीय

दि. ५ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट १९८१ च्या दरम्यान कोपरगाव तालुक्यातील साकरवाडी येथे गंगागिरी महाराजांचा हरिनाम सप्ताह साजरा झाला. कष्टकरी वर्गात एकजुटीची भावना निर्माण करण्याचे साधन म्हणून समाजवादी कामगार कार्यकर्ते किशोर पवार यांनी त्यात पुढाकार घेतला होता. त्याचा खर्च भरून काढण्यासाठी कामगारांकडून पैसे गोळा करण्यात आले होते. हरिनाम सप्ताहामुळे कामगारांची एकजूट साधून दारिद्र्य, बेकारी, महागाई, विषमता, जातियता, समाजातील इतर दुःखे आणि संकटे यापासून समाजाला खरोखरच मुक्ती मिळत असेल तर त्याला कोणाचाच विरोध असण्याचे कारण नाही. पण हरिनाम सप्ताहामुळे असा कोणताही लाभ होणार नाही हे उघड आहे. उलट कष्टकऱ्यांमध्ये कर्मकांड, अंधश्रद्धा, दैववाद, देवभोळेपणा, परंपरावाद जोपासला जाणार आहे. मग कष्टकऱ्यांमध्ये स्वतःच्या ताकदीबद्दल आत्मविश्वास, एकजुटीच्या जोरावर कष्टकऱ्यांना हक्क आणि न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या शक्यतेची जाण कशी निर्माण होणार? प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य आहे हे जरी खरे असले तरी लोकांच्या धर्मभोळेपणाला खतपाणी घालून लोकशाही समाजवादी समाज निर्माण होणे शक्य आहे काय? सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यातील साधने निवडताना कोणतेही साधन जातिवादाला, भांडवलशाहीला, प्रस्थापित अन्यायकारक व्यवस्थेला पोषक होणार नाही हे जरूर पाहिले पाहिजे. नाहीतर समतेचा लढा अधिकाधिक तीव्र न बनता अधिकाधिक ठिसूळ, भेगाळलेला आणि बोथट होत जाईल.

शेकडो वर्षे लोकांमध्ये पारंपारिक धर्मभावना धार्मिक अंधश्रद्धा जोपासल्या गेल्यामुळे त्याचे परिणाम स्वातंत्र्योत्तर काळातही स्पष्ट जाणवत आहेत. स्वातंत्र्य मिळून ३४ वर्षे झाली तरी दलितांची परिस्थिती फारशी बदलली नाही. कायद्याने त्यांना राखीव जागा आणि इतर जे हक्क दिले आहेत त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून ते धडपडू लागताच त्यांच्यावर अत्याचार होतात, त्यांची हत्याकांडे होतात, त्यांच्या बायकांची अब्रू लुटली जाते. नामांतर, आंदोलन, पिंप्रा, बेंजतपूर, गुजराथ राखीव जागाविरोधी आंदोलन वगैरे प्रकरणे लक्षात घेता तामिळनाडूतील मिनाक्षीपुरम, कुरियूर आणि अन्य ठिकाणी होत असलेली सामूहिक धर्मांतराची कारणामिमांसा करणे फारसे अवघड नाही. ज्यांनी धर्मांतर केले ते हरिजन आहेत. कोणी गरीब सवर्ण नाहीत. शिवाय ही धर्मांतरे ऐच्छिक आहेत. ज्या धर्माने त्यांना काहीच दिले नाही, उलट त्यांचे शोषण करून त्यांचे श्रम, त्यांची अस्मिता लुटली तो टाकाऊ हिंदू धर्म त्यांनी रद्दी म्हणून पैशासाठी विकला तर त्यात नवल काय? (अर्थात त्यांनी पैसा घेतलाय हे अजून सिद्ध व्हायचंय.) ज्या धर्माने त्यांना शेकडो वर्षे शिक्षण, संपत्ती, सामाजिक प्रतिष्ठा नाकारून फक्त अज्ञान, दारिद्र्य, उपेक्षा, अपमानित, लाचारीचे जिणे दिले त्या धर्माबद्दल त्यांना आपुलकीची भावना कशी वाटणार? मग असा धर्म त्यांनी सोडला तर त्यात त्यांचे काय बिघडणार आहे? ज्या राष्ट्रात घटनेने मान्य करूनही धर्मनिरपेक्ष राज्य प्रस्थापित होऊ शकलेले नाही, उलट धर्माचेच राजकारण जेथे केले जाते ते राष्ट्र, ज्या राष्ट्रात दलितांना अन्याय अत्याचाराचे बळी व्हावे लागते ते राष्ट्र मुस्लीम झाले किंवा दुभंगले तर त्याचे सोयरसुतक त्यांना न वाटणं सहाजिक आहे. हिंदू धर्माबद्दलचा त्यांचा राग, चीड, असंतोष आपण समजून घ्यायला पाहिजे.

हिंदुत्वनिष्ठ आता खडबडून जागे झाले आहेत. आपले संख्याबळ कमी होत आहे हे पाहून त्यांचा मुस्लीमद्वेष उफाळून आला आहे. धर्मांतर रोखण्याचे सर्वतोपरी प्रयत्न चालू झाले आहेत. आपण पुरोगामी विचाराचे लोकही अस्वस्थ झाले आहोत. हिंदू धर्माचा ऱ्हास होतोय म्हणून नव्हे. तर हिंदू समाजात, भारत राष्ट्रात दलितांना समानता आणि न्याय मिळवून देऊन आपल्या पूर्वजांनी केलेल्या त्यांच्यावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यात आपल्याला आलेल्या अपयशाची खंत वाटते म्हणून, धर्म निरपेक्ष राज्य स्थापन करण्याचे आपले स्वप्न धुळीला मिळत आहे म्हणून. धर्मांतर करूनही दलितांचे प्रश्न खऱ्या अर्थाने सुटणार नाहीत याची आपल्याला जाण आहे म्हणून. पाकिस्तान

हे मुस्लीम राष्ट आपले शेजारी राष्ट्र आहे आणि त्याच्याशी आपले संबंध मैत्रीचे नाहीत हरिजनांनी सवर्णांवरील रागामुळे जरी मुस्लिम धर्म स्वीकारला असला तरी वेळप्रसंगी त्यामुळे राष्ट्राला धोका निर्माण होण्याचा सभव आहे ह्यामुळे आपण अस्वस्थ झाले आहोत. बौद्ध धर्म स्वीकारूनही दलितांना न्याय मिळू शकला नाही. तेव्हा हिंदू धर्माला शह देणारा मुस्लीम धर्म स्वीकारण्याचे त्यांनी ठरवले असावे. हा सवर्ण हिंदूंना दाखविलेला धोक्याचा कंदिल आहे. ' आमच्यावरील अन्याय, अत्याचार थांबवा. आम्हाला सामाजिक आर्थिक न्याय द्या. अन्यथा आम्ही मुस्लीम धर्म स्वीकारून वेळप्रसंगी तुमच्या शत्रू पक्षालाही मिळू ' अशी धोक्याची सूचना त्यांनी दिली आहे. आता तरी सवर्ण हिंदूंनी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला चिमटा घेऊन जागं केलं पाहिजे. पेट्रोडॉलरर्सविरुद्ध नुसता आरडाओरडा करत न बसता धर्मांतराचे मूळ कारण लक्षात घेऊन उपाय योजना केली पाहिजे. कायद्याने धर्मांतरला बंदीघालून प्रश्न सुटणार नाही. धार्मिक स्वातंत्र्य घटनेने मान्य केले असल्यामुळे धर्मांतराचे स्वातंत्र्य त्यात अभिप्रेत आहेच. काळानुसार हिंदू धर्माचे परिवर्तन आणि धर्मनिरपेक्ष राज्याची स्थापना या गोष्टी झाल्या पाहिजे. जातियता नष्ट करून दलितांवरील अन्याय अत्याचार थांबवले पाहिजेत. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देऊन त्यांच्यातील दारिद्रच व बेकारी दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यादृष्टीने सर्वांगीण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास आपण तयार झाले पाहिजे. दलितांनीही हे लक्षात घेतले पाहिजे की धर्मांतराने त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. मुस्लीम धर्मात आणि मुस्लीम राष्ट्रातही धर्माचे प्राबल्य, हुकूमशाही, दारिद्रच, विषमता, शिया सुनीवाद स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार आहेत. दलितांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक लढ्यात त्यांनी सामील होणे हाच खरा मार्ग आहे. भाषा, जाती धर्म वगैरे वाद माजवून दलित कष्टकऱ्यांच्या एकजुटीत भेद पाडण्याची प्रस्थापितांची, भांडवलदारांची नीती आपण जाणून घेतली पाहिजे. तिला न जुमानता एकजुटीने लढ्यात सामील झाले पाहिजे समाजवादी समाजव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सामाजिक क्षेत्रात परिस्थिती बिकट झाली असता आर्थिक क्षेत्रातही असंतोष वाढत आहे. घासलेट, सिमेंट, स्वयंपाकाचा गॅस, डिझेल, पेट्रोल, खते आदींच्या किंमतीत सरकारने नुकतीच वाढ जाहिर केली आहे. वहातूक खर्च, शेतमालाचा खर्च आणि औद्योगिक मालाचा खर्च त्यामुळे वाढून वस्तूंच्या किमती अधिकच वाढणार. बेकारी, दारिद्रच, महागाईने जर्जर झालेल्या सामान्य जनतेवर हा आणखी एक आघात होत आहे महागाईने होरपळून निघालेल्या सर्वसामान्य माणसाला जीवन जगणे अशक्य होऊ लागलेले आहे. तेल, साखर चहा, दूध यासारख्या वस्तू गोरगरिबांना दुर्लभच आहेत. परंतु मध्यम वर्गीयांनासुद्धा त्या खरेदी करणे अवघड होऊ लागले आहे. घासलेट, वीज, कोळसा गॅस महाग झाल्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय गृहिणींना संसार करणे कठीण झाले आहे. संघटित कामगारांना आणि सरकारी नोकरांना महागाई भत्त्यात वेळोवेळी दिली जाणारी वाढ आधीच वाढलेल्या किंमती केव्हाच गिळून टाकतात.

या वाढत्या महागाई, दारिद्रच आणि बेकारीशी मुकाबला करण्यासाठी कामगार अधिकाधिक संघटित होण्याच्या प्रयत्नात असतानाच २७ जुलै १९८१ ला अत्यावश्यक सेवातील कर्मचाऱ्यांना संप करण्यास बंदी घालणारा वटहुकूम राष्ट्रपतींनी जारी केला. रेल्वे, टपाल व तार खाते, दूरध्वनी, गोदी, बँका, पेट्रोलियम उद्योग, सार्वजनिक बांधकाम व सफाई वगैरे अनेक उद्योग अत्यावश्यक सेवा म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत आणि इतरही सेवा अत्यावश्यक ठरविण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. या वटहुकूमाचा उपयोग वेतन, महागाई भत्ता वगैरे गोठविण्यासाठी केला जाईल की काय अशी रास्त भिती कामगारांच्या मनात आहे. आणिबाणी जाहिर झाली नसली तर ती लादली जात असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. कामगार नेते डॉ. दत्ता सामंतांची सुटका करावी असा आदेश मुंबई हायकोर्टाने दिल्यावर त्यांची सुटका करून पुन्हा त्यांना ताबडतोब अटक करण्याचा प्रकार म्हणजे सरकारच्या अरेरावीपणाचा आणि बेमुर्तखोरपणाचा द्योतक आहे. आपल्या हक्कासाठी, न्यायासाठी झगडण्याचा कामगारांचा मूलभूत हक्कच नव्या वटहुकूमाने पायदळी तुडवला आहे. या वटहुकूमाविरुद्ध निरनिराळ्या कामगार संघटना एकजूटीने लढू पहात आहेत. हे कामगारांच्या जागृकतेचे द्योतक आहे. या एकजूटीच्या जोरावर हा वटहुकूम रद्द करता आला तर परिवर्तनाच्या लढ्यातील एक महत्वाचे पाऊल आपण पुढे टाकले असे म्हणायला हरकत नाही. देशात चालू असलेल्या सर्व घडामोडी लक्षात घेता सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच आघाड्यांवर लढा देण्यासाठी आपल्याला सिद्ध व्हावे लागणार आहे हे स्पष्ट आहे. सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वेगाने वाटचाल करायला हवी. आपली सारी ताकद त्यासाठी पणाला लावायला हवी.

संपादक